# हॅलो प्रभात





# विवेकानंद कॉलेजचा पुण्यात सन्मान

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पुरग्रस्तांना एनएसएस व एनसीसीमार्फत केलेल्या भरीव मदतीबद्दल विवेकानंद कॉलेजचा सन्मान मॉडर्न क़ॉलेज, पुणे येथे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील, संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाला. अतिवृष्टीग्रस्त करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय दत्तक घेऊन साहित्य, कपडे, आर्थिक मदत व आवश्यक सुविधा विवेकानंद कॉलेजकडून पुरविण्यात आल्या.

हा सन्मान श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात, डॉ. संदीप पाटील, डॉ. ए.एस. कुंभार, डॉ.पी.आर.बागडे व डॉ. ए.एस. महात यांनी स्वीकारला. या उपक्रमात सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, सहा. ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे व रजिस्ट्रार एस.के. धनवडे यांचे विशेष सहकार्य लाभले.


epaper.helloprabhat.in
22 Nov 2025 - Page 4